सत्र खटला क्र.५४/२०२३
सरकार वि. सर्जेराव
निशाणी क्र. ३१

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. <u>०३</u> यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | रामेश्वर नामदेवराव पारवे |
| वय | – | ३३ वर्षे. |
| व्यवसाय | – | पोलीस उपनिरीक्षक, गुन्हे शाखा, पुणे शहर |
| राहणार | – | पुणे ता.जि.पुणे |

<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती सोनाली सावजी यांचे मार्फत</u>–

०१. दिनांक ०१.०७.२०२० रोजी मी पोलीस उपनिरीक्षक म्हणुन पो.स्टे. सिंदखेडराजा येथे कार्यरत होतो. त्या दिवशी स्टेशन डायरी इनचार्ज म्हणुन माझी डयुटी असतांना, फिर्यादी द्रौपदी यांनी आमच्या पोलीस स्टेशनला येवून घटनेची फिर्याद दिली होती. जी मी तिने सांगितल्याप्रमाणे टंकलिखीत करुन घेतली. त्यावर तिची सही घेतली व मी समक्ष म्हणुन सही केली. ती फिर्याद नि.क्र. १४ आता मला दाखविण्यांत आली. फिर्याद देतेवेळेस तिने त्यातील अधोरेखांकीत भाग अ सांगितला होता. तो खरा असून बरोबर आहे. त्या तक्रारीचे आधारे मी सदर प्रकरणामध्ये गुन्हा नोदविला. त्या सबंधीच्या फार्मवर मी तिची सही घेवून, माझी सही केली. त्यातील मजकूर फिर्याद प्रमाणे बरोबर आहे. छापील पहिली खबर नि.क्र.१५ ही तिच आहे.

<u>उलटतपास सरकारी वकील श्री. आर.बी.तायडे यांचे मार्फत.</u>

०२. हे खरे नाही की, असे मी खोटे सांगत आहे की त्या दिवशी मी पो.स्टे. सिंदखेडराजा येथे हजर असतांना फिर्यादीने दिलेली फिर्याद मी तिने सांगितल्याप्रमाणे टंकलिखीत करुन घेतली आणि त्यातील मजकूर तिने सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे. हे खरे नाही की, सदरची फिर्यादमधील मजकूर फिर्यादीने सांगितला नव्हता. हे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटा गुन्हा नोंदविला आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. <u>उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही</u>.

वा.दा.ब. अ.क.क.

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.21 17:42:09 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

समक्ष

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.21 17:42:17 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

दिनांक : २०/०२/२०२६.